।। ग्राम्यजनहितं परमं ध्येयम् ।।
प्रवरा मेडिकल ट्रस्टचे
आर्टस्, कॉमर्स अँण्ड सायन्स कॉलेज, शेवगाव
आयुर्वेद कॉलेज कॅम्पस, शेवगाव, ता. शेवगाव, जि. अहिल्यानगर ४१४५०२ (महा.)
● NAAC - 'B', CGPA 2.48 ● Ph.No. (02429) 295445, Mob. 9673007548
■ Code : 1481 ■ PU/AN/SCI/136/2013 ■ Email : pmt.acsc@gmail.com ■ Webiste : www.pmtacsc.com

**अत्यंत महत्वाचे/कालमर्यादेचे**

**परिपत्रक क्र.** 02/2026

वरिष्ठ महाविद्यालयातील सर्व विभाग प्रमुखांना या परिपत्रकाद्वारे अवगत करण्यात येते की, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे **उन्हाळी सत्र मार्च/एप्रिल २०२६ अंतर्गत मूल्यमापन परीक्षेचे** आयोजन केलेले असून त्या संबंधित आखलेल्या योजनेची अंमलबजावणी संदर्भात खालील कार्यपद्धती अवलंबिण्यात यावी.

१. प्रस्तुत परीक्षेचे आयोजन करत असताना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांनी वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांचे अवलोकन करावे.

२. प्रस्तुत परीक्षेचे वेळापत्रक प्रकाशित करण्याची जबाबदारी महाविद्यालय परीक्षा विभागावर राहील.

३. प्रस्तुत परीक्षा या वेळापत्रकानुसार आपल्या विभाग स्तरावर आयोजित करण्यात याव्यात.

४. विभाग प्रमुखांनी विषयानुसार संबंधित विषय शिक्षकांकडून प्रश्नपत्रिका तयार करून घ्याव्यात.

५. अंतर्गत मूल्यमापन परीक्षा संपल्यानंतर आपल्या विभागाचा अनुपस्थिती अहवाल (Absent Report) ०२ दिवसात विषयनिहाय महाविद्यालय परीक्षा विभागास विभाग प्रमुखांच्या सहीनिशी जमा करावा.

६. प्रस्तुत परीक्षेसाठी अनुपस्थिती अहवालानुसार (Absent Report) पुन:परीक्षेचे (Re Exam) आयोजन करण्यात येईल.

७. पुन:परीक्षेसाठी (Re Exam) विद्यार्थीने परीक्षा संपल्यानंतरच्या पुढील १० दिवसात हस्तलिखित अर्ज असणे आवश्यक. सदर अर्जावर विभाग प्रमुखांची सही असणे आवश्यक.

८. प्रस्तुत परीक्षा पार पडल्यानंतर विभाग प्रमुखांनी आपल्या विभागाचा मूल्यमापन अहवाल (Asssessment Report) महाविद्यालय परीक्षा विभागात जमा करावा.

९. प्रस्तुत परीक्षेच्या आयोजनासाठी आपल्या विभागातील उपलब्ध सहकार्यांना पर्यवेक्षणाची जबाबदारी सोपवावी. आवश्यकतेनुसार इतर विभागातील सहकारी संबंधित विभाग प्रमुखाच्या परवानगीने पर्यवेक्षणासाठी घ्यावेत.

१०. प्रस्तुत परीक्षेसाठी आवश्यक असणारी स्टेशनरी महाविद्यालय परीक्षा विभागातून नोंदवून घेऊन जावी.

११. प्रस्तुत परीक्षेसाठी ४ पानी उत्तरपत्रीकांचाच वापर करण्यात यावा.

१२. या उपरोक्त आपणास असेही निर्देशित करण्यात येते की, अंतर्गत मूल्यमापनासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांनी दिलेल्या इतर मूल्यमापन पद्धतीचा अवलंब आपल्या विभाग स्तरावर करण्यात यावा.

मा.विभाग प्रमुख, वर्गशिक्षक तसेच विषय शिक्षक यांनी नमूद परीक्षा संबंधी काटेकोर अंमलबजावणी करून वरील प्रक्रिया वेळेत पूर्ण करण्यासाठी तत्परतेने योग्य ती कार्यवाही करावी ही विनंती.

महाविद्यालय परीक्षा विभाग

जा. क्र. ४६० दि. १२/०३/२०२६

डॉ. ओंकार जीवन रसाळ

प्राचार्य

प्रवरा मेडिकल ट्रस्टचे

आर्टस्, कॉमर्स अँण्ड सायन्स कॉलेज

शेवगांव, जि. अहिल्यानगर

प्रत माहितीसाठी:

१. समन्वयक, अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्ष, प्रस्तुत महाविद्यालय

२. सर्व विभाग प्रमुख, प्रस्तुत महाविद्यालय